25 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# 'स्त्री जन्माचे स्वागत करूया'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'आज मुलगी जन्मली नाही, तर उद्याची आई होणार नाही. आणि जर आई झाली नाही तर मनुष्यनिर्मिती होणार नाही. त्यामुळे आई नाही तर माणुसकीच उरणार नाही. यासाठी स्त्री-जन्माचे स्वागत करूया' असे आवाहन डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

युनिसेफ, जर्नालिझम विभागामार्फत कार्यशाळा

युनिसेफ अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे 'सामाजिक हिंसा आणि शोषण' या विषयावर पत्रकारांसाठी कार्यशाळा पार पडली. यावेळी 'मुलगा वंशाचा दिवा आहे तर मुलगी ही वंशाची पणती' असल्याचेही त्यांनी मत मांडले.

'स्त्री जन्माचे स्वागत करुया' विषयावर बोलताना डॉ. कांकरिया म्हणाल्या, 'गेल्या ३० वर्षात दीड कोटी चिमुकल्यांची गर्भातच हत्या झाली. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या काही वर्षापूर्वी स्त्री बीज नको हे समाजमनात रुजले आहे. या बीजाचे स्वागत करण्यासाठी समाजात पोषक वातावरण निर्माण करण्याची



डॉ. सुधा कांकरिया

आवश्यकता आहे. तरच आपल्याला समतेचे वातावरण सर्वत्र आणता येईल. त्यातून आपल्याला स्त्री समतेचे तत्त्व आचरणात आणता येईल. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न झाले पाहिजेत.'

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात 'शाश्वत विकास' विषयावर बोलताना प्रा. डॉ. जय सामंत म्हणाले, 'शाश्वत विकासासाठी नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास रोखणे, पर्यावरणरक्षण व निसर्ग संवर्धन, मानवी आत्मकेंद्रित प्रवृत्तीमध्ये बदल आवश्यक आहे. पर्यावरण शिक्षण व जागृतीसाठी योग्य नियोजन आवश्यक आहे. त्यातूनच पर्यावरण जागृतीसाठी अथक प्रयत्न करता येतील. पर्यावरण टिकवले तरच आपण आपला विकास साधू शकतो.'

'गरोदर मातांची उपासमार, संतुलित आहाराचा अभाव, योग्य वैद्यकीय सेवा व उपचारांमुळे अर्भकांच्या मृत्युचे प्रमाण वाढत आहे. यासाठी गरोदर मातांनी योग्य तपासणी व उपचार करणे आवश्यक आहे. वैद्यकीय क्षेत्रातील आधुनिक तंत्राचा वापर करून आपल्याला जास्तीत जास्त सुविधा देणे शक्य आहे. त्यातुनच आपल्याला अधिकाधिक चांगल्या सुविधा देता येतील. महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने आपण काळजी घेणे हे महत्त्वाचे आहे. तरच सक्षम समजाची निर्मिती करता येईल. प्रसूती पूर्व व प्रसूती पश्चात वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असल्याचे मत पत्की रिसर्च फाउंडेशनच्या डॉ. श्वेता पत्की यांनी व्यक्त केले.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात प्राचार्या मंगला पाटील-बडदारे, प्रा. साधना झाडबुके यांनी मनोगत व्यक्त केले. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यशाळेला डॉ. सुमेधा साळुंखे, सुनील जाधव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व पत्रकार आदी यावेळी उपस्थित होते.

25 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# पर्यावरण रक्षणासाठी कृतिशीलतेची गरज

## प्रा. डॉ. जय सामंत : वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे कार्यशाळा

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २४ : 'पर्यावरणाच्या रक्षणासाठी कृतिशील पाऊल न उचलल्यास पश्चात्तापाची संधी मिळणार नाही,' असे प्रतिपादन ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. युनिसेफतर्फे संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी वर्षभर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. त्याचा भाग म्हणून 'सामाजिक हिंसा आणि शोषण' विषयावर निलांबरी सभागृहात कार्यशाळा झाली.

डॉ. सामंत म्हणाले, ''वाढत्या लोकसंख्येचा वेळीच विचार न झाल्यास पर्यावरणातील परिणामांना सामोरे जाण्याची वेळ येऊन ठेपणार आहे. लोकसंख्येच्या मुद्द्याबाबत राजकीय नेत्यांच्या जाहीरनाम्यात विचार केला जात नाही. तंत्रज्ञानाचा गैरवापर वाढतोय, हेही लक्षात घेतले जात नाही. भविष्यात श्रीमंत लोकांत पर्यावरणातील संसाधनांसाठी कलह निर्माण होणे अटळ असल्याचे चित्र दिसत आहे. कारण पर्यावरणात होणारे बदल हे दुरुस्त न होणारे आहेत. त्यामुळे पर्यावरणाच्या संरक्षणासाठी कृती करण्याची गरज असून शाश्वत विकासावर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे.'' त्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाची १९७२ ला स्टॉकहोमला झालेली कॉन्फरन्स, १९८३ ला स्थापन झालेले दि वर्ल्ड कमिशन ऑन एन्व्हायर्न्मेंट अँड डेव्हलपमेंट, १९९२ ला रिओ येथे पर्यावरण आणि विकासासाठी झालेला पहिला अजेंडा, २०१५ ला झालेला 'फ्युचर वुई वॉंट' या विकासात्मक अजेंड्यासंबंधी माहिती दिली. तसेच शाश्वत विकासाच्या सतरा मुद्द्यांबाबत मार्गदर्शन केले.

डॉ. श्वेता पत्की यांनी नवजात बालकांचा जन्म व मृत्युदरासंबंधी माहिती देत जुळी मुले होण्यामागची कारणमीमांसा केली. न्यू लॉ कॉलेजच्या प्राचार्या डॉ. मंगला पाटील-बडदारे 'बाल हिंसा प्रतिबंधक कायदा,' व डॉ. सुधा कांकरिया यांनी 'बेटी बचाओ' अभियानासंबंधी मार्गदर्शन केले.

तसेच बेटी बचाओ विषयाची शपथ दिली. तसेच एकच मुलगी असलेल्यांचा सत्कार केला. डॉ. साधना झाडबुके यांनी वंचितांच्या प्रश्नांवर माहिती दिली. डॉ. राजेंद्र पारिजात उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी प्रास्ताविक केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले.





**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत 'बेटी बचाओ' अभियानाची शपथ घेताना डॉ. सुमेधा साळुंखे, प्रा. डॉ. निशा पवार, प्राचार्या डॉ. मंगला पाटील-बडदारे, डॉ. सुधा कांकरिया, चंद्रशेखर वानखेडे, डॉ. राजेंद्र पारिजात. दुसऱ्या छायाचित्रात वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत बोलताना ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ प्रा. डॉ. जय सामंत.**

25 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

## सुधा कांकरिया : वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागात पत्रकारांसाठी कार्यशाळा

**कोल्हापूर :** गेल्या ३० वर्षांत दीड कोटी चिमुकल्यांची गर्भातच हत्या करण्यात आली आहे. महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. 'स्त्री नको' हे बीज समाजमनात गेल्या काही वर्षांपूवी रुजले आहे. ते बीज उगवू नये यासाठी स्त्रीजन्माचे स्वागत करुया, असे पोषक वातावरण समाजात निर्माण करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. सुधा कांकरिया यांनी मंगळवारी येथे केले.

'युनिसेफ' अंतर्गत शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग आणि मास कम्युनिकेशन विभागातर्फे पत्रकारांसाठी आयोजित कार्यशाळेत त्या बोलत होत्या. 'स्त्रीजन्माचे स्वागत करु' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. निलांबरी सभागृहातील या कार्यशाळेचा विषय 'सामाजिक हिंसा आणि शोषण' असा होता. डॉ. कांकरिया म्हणाल्या, आज मुलगी जन्मली नाही, तर उद्याची आई होणार नाही आणि जर आई झाली नाही तर मनुष्यनिर्मितीही होणार नाही. यामुळे आई नाही तर माणुसकीच राहणार नाही. यासाठी स्त्रीजन्माचे स्वागत करूया. या कार्यक्रमात ज्या दाम्पत्यांना केवळ मुली आहेत, त्यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविले. स्त्रीचा आदर राखणे, स्त्री जन्मदर वाढविणे या विषयाची शपथ त्यांनी दिली.

यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, सुनील जाधव, सुधाकर बर्गे, आदी उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. चंद्रशेखर वानखेडे यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, कार्यशाळेत विविध सत्रांत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. यात प्रा. साधना झाडबुके यांनी उपस्थितांशी संवाद साधला. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत डॉ. सुधा कांकरिया यांनी स्वलिखित पुस्तके देऊन प्राचार्या मंगला बडदारे यांचा सत्कार केला. यावेळी डावीकडून डॉ. सुमेधा साळुंखे, विभागप्रमुख डॉ. निशा पवार, प्रा. साधना झाडबुके उपस्थित होत्या.

### तज्ज्ञ म्हणाले...

- प्रा. डॉ. जय सामंत : शाश्वत विकासासाठी साधनसंपत्तीचा ऱ्हास रोखणे, पर्यावरण रक्षण व निसर्ग संवर्धन, मानवी आत्मकेंद्रित प्रवृत्तीमध्ये बदल आवश्यक आहे.
- डॉ. श्वेता पत्की : गरोदर मातांची उपासमार, त्यांचा असंतुलित आहार, योग्य वैद्यकीय सेवा व उपचारांचा अभाव या कारणांमुळे अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण वाढत आहे. यासाठी गरोदर मातांनी योग्य तपासणी व उपचार करणे आवश्यक आहे.
- प्राचार्य मंगला बडदारे : लहान मुलामुलींच्या शोषणाचे प्रमाण वाढत आहे. पालक मुलांना लहानपणापासून आपली संपत्ती समजतात; यामुळे या शोषणामध्ये वाढ होत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

25 JAN 2017

पुढारी

# विद्यार्थ्यांकडून 'लेक वाचवा, लेक शिकवा'चा नारा...

## विद्यापीठ समाजशास्त्र विभागाकडून पथनाट्याचे सादरीकरण

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'लेक वाचवा, लेक शिकवा', 'लेक वाचवा, माणूस वाचवा' पथनाट्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्त्रीभ्रूण हत्या यासारख्या गंभीर प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाओ अभियानांतर्गत समाजशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांनी बालिका दिनानिमित्त मंगळवारी (दि.२४) शहरातील भवानी मंडप, बिंदू चौक, मिरजकर तिकटी, पद्माराजे गर्ल्स हायस्कूल व न्यू हायस्कूल या ठिकाणी विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले आले. बेटी बचाओ अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या दोन गटांनी शाळा, महाविद्यालय परिसरात पथनाट्य सादर करून जनजागृती केली.



**कोल्हापूर : बेटी बचाओ अभियानांतर्गत 'लेक वाचवा, लेक शिकवा' हे पथनाट्य सादर करताना शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभागातील विद्यार्थी. (छाया : संदीप मोरे)**

पथनाट्यात एम. ए. भाग १ मधील विद्यार्थी सुहास रोमाणे, नगमा सय्यद, मृणाल खोत, अमित गवळी, पूनम जांभळे, प्रीती रेडेकर, अमर माने, आकाश पाटील, अपुर्वा कुंजिरे व एम. ए. भाग २ चे विद्यार्थी विक्रम भोपळे, प्राजक्ता कांबळे, स्नेहा कांबळे, स्नेहल पट्टणशेट्टी, आशुतोष भोसले, नीलम सपाटे, छाया कांबळे, रूपाली हाके या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

25 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# नॅक मानांकनात डीकेटीई देशात अव्वल

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील डीकेटीईच्या टेक्स्टाईल अँड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटला नॅकच्या उच्चपदस्थ समितीने 'ए' प्लस श्रेणीचे मानांकन घोषित केले आहे. युजीसीच्या नॅक समितीमार्फत झालेल्या भेटीनंतर हा उच्च दर्जा देण्यात आला आहे. नॅकचा 'ए' प्लस दर्जा प्राप्त करणारी डीकेटीई संस्था देशातील आघाडीची संस्था असल्याची माहिती संस्थाध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

उच्चपदस्थ समितीने १९ ते २१ डिसेंबर २०१६ रोजी संस्थेस भेट दिली. डीकेटीई संस्थेच्या सीजीपीए स्कोर ३.५३ असा आहे. हा स्कोर मिळविण्यासाठी इन्स्टिट्यूटचे शैक्षणिक कार्य, संशोधनात्मक कार्य आणि औद्योगिक क्षेत्रासंबंधी उच्च पातळीचे कार्य असणे गरजेचे आहे. अॅटोनॉमस डीकेटीईच्या इतिहासामध्ये हा सुवर्ण क्षण आहे. विशेष म्हणजे २३ जानेवारी रोजी झालेल्या २१ व्या स्थायी समितीमध्ये नॅकने ६१ कॉलेजला दिलेल्या श्रेणीच्या अहवालामध्ये डीकेटीई अव्वल स्थानावर आहे.

डीकेटीई संस्थेच्या परीक्षणासाठी आलेल्या समितीमध्ये शिरोसी मोहन डॅन, व्हाईस चान्सलर युनिव्हर्सिटी ऑफ बरदवान (वेस्ट बंगाल), प्रा. विद्याधर रेड्डी अॅलेनी, डिपार्टमेंट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, ओस्मानिया युनिव्हर्सिटी (हैदराबाद), डॉ. डी. सर्वनन, प्राचार्य, बन्नारी अमन ऑफ इन्स्टिट्यूट अँड टेक्नॉलॉजी (तामिळनाडू) यांचा समावेश होता.



इचलकरंजी : डीकेटीईस नॅक समितीने 'ए' प्लस श्रेणीचे मानांकन घोषित केले. यावेळी मानांकन हस्तांतरण करताना संस्थाध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, ट्रेझरर आर. व्ही. केतकर, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, विश्वस्त प्रकाश मोरे, सुनील पाटील, स्वानंद कुलकर्णी, अनिल कुडचे.

तपासणीच्या अंतिम दिवशी विविध निकषांआधारे पाहणी अहवाल प्राचार्यांकडे सुपूर्द केला. त्यावेळी संस्थेतील प्राध्यापकांचे अविरत परिश्रम, औद्योगिक क्षेत्राशी संस्थेचा असलेला घनिष्ट संबंध व करार आणि सीईटीपी, महिला गारमेंट प्रशिक्षण, सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून होणारे सामाजिक कार्य याचा नॅक समितीने विशेष गौरवपूर्ण उल्लेख केला होता. त्यानंतर सोमवारी बेंगलोर येथे नॅक समितीची बैठक झाली. यामध्ये डीकेटीईस 'ए' प्लस दर्जा घोषित करण्यात आला.

या यशामध्ये संस्थेतील प्राध्यापक व कर्मचारी यांच्याबरोबरच संस्थाध्यक्ष कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, खजिनदार आर. व्ही. केतकर, मानद सचिव डॉ. सपना आवाडे, विश्वस्त, संचालक, प्राचार्य प्रा. डॉ. पी. व्ही. कडोले, उपप्राचार्या प्रा. डॉ. एल. एस. आडमुठे, उपप्राचार्य प्रा. डॉ. यु. जे. पाटील, प्रा. डॉ. व्ही. आर. नाईक, नॅक को-ऑर्डिनेटर व मेकॅनिकल विभागप्रमुख, सर्व विभागप्रमुख यांचे योगदान आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 JAN 2017

तरुण भारत

# राष्ट्रीय मतदार दिन रॅली आज कोल्हापुरात

**कोल्हापूर :** राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त बुधवार २५ रोजी शहरात भव्य मतदार जनजागृती रॅली काढण्यात येणार आहे. सकाळी ८.३० वाजता ऐतिहासिक दसरा चौकात रॅलीला सुरूवात होणार आहे. या रॅलीचे कोल्हापूर महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय व तहसिलदार कार्यालय यांचे संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे. या रॅलीमध्ये या कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी, एन.सी.सी., एन.एस.एस.चे विद्यार्थी/विद्यार्थिनी, महिला बचत गटाच्या महिला मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. सुरुवातीस बिंदू चौक येथे नेहरु युवा केंद्राच्या वतीने जनजागृतीपर पथनाट्य सादर करण्यात येईल. त्यानंतर जनजागृती रॅलीस प्रारंभ होईल. ही बिंदू चौक–शिवाजी पुतळा–महानगरपालिका–टाऊन हॉलमार्गे दसरा चौक शाहू स्मारक भवन येथे विसर्जीत होणार आहे. या रॅलीमध्ये नागरिकांना मतदार यादीमध्ये नांव नोंदविणेबाबत आवाहन करण्यात येणार आहे. दरम्यान, शाहू स्मारक भवन येथे सकाळी साडे नऊ वाजता होणाऱ्या कार्यक्रमामध्ये विशेष पोलीस महानिरीक्षक विश्वास नांगरे–पाटील मार्गदर्शन करणार आहेत. तसेच नव्याने नोंदणी केलेल्या मतदारांना ओळखपत्रक, बिल्ले वाटप व बक्षीस वितरण होणार आहे. नवमतदारांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. महापालिकेच्या एका वाहनांवर एल.ई.डी.स्क्रिन लावण्यात येणार आहे. याद्वारे शहरात या जाहिरातीचे प्रसारण करण्यात येणार आहे. तसेच शहरातील भवानी मंडप, शिवाजी चौक व दाभोळकर कॉर्नर व इतर ठिकाणी असलेल्या डिजीटल स्क्रिनवरही या व्हिडिओचे प्रसारण करण्यात येणार आहे.